# मराठवाड्यातील शेतकरी पिकवतोय ‘सोनेरी’ कापूस

## दहा टक्के दर अधिक; १६ गावांमध्ये लागवड

संतोष मुंढे : अॅग्रोवन वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर : मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी यंदा खरिपात शंभर एकरांवर नैसर्गिक सोनेरी रंगाच्या कापसाची लागवड करून उत्पादन घेतले आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना जिल्ह्यांतील पाच तालुक्यांतील सुमारे १६ गावांमध्ये दीडशे शेतकऱ्यांनी या कापसाचे उत्पादन घेतले. या कापसाची दहा टक्के अधिक दराने एका शेतकरी उत्पादक कंपनीने खरेदी सुरू केली असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.** पान ४ वर »



नैसर्गिक सोनेरी रंगाचा कापूस.

> माझ्या गावातील तीन शेतकऱ्यांनी प्रत्येकी एक एकर, तर मी चार एकरांवर सोनेरी रंगाच्या कापसाची लागवड केली आहे. मला एकरी ९ क्विंटल उत्पादन मिळाले. चार एकरांत ३६ क्विंटल १८ किलो कापूस झाला. कराराप्रमाणे दुधना हायटेक कृषी प्रोड्यूसर कंपनी बाजारभावापेक्षा १० टक्के अधिकचा दर देऊन कापूस घेऊन गेली.
> - **दादासाहेब मोईन**, थोर वाघलगाव, ता. वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर

# मराठवाड्यातील शेतकरी पिकवतोय ‘सोनेरी’ कापूस

» पान १ वरून

दुधना हायटेक कृषी प्रोड्यूसर कंपनीच्या माध्यमातून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील छत्रपती संभाजीनगर, गंगापूर, वैजापूर व फुलंब्री तसेच जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यातील सुमारे १६ गावांतील शेतकऱ्यांनी सोनेरी रंगाच्या कापूस उत्पादनासाठी पुढाकार घेतला आहे.

या संदर्भात कंपनीचे संचालक संभाजी शेजूळ म्हणाले, की नुजिवीडू सीड, कंपनीच्या समन्वय व सहकार्यातून हा प्रयोग राबविला गेला. गतवर्षी खरीप हंगामात प्रयोग म्हणून दोन शेतकऱ्यांच्या शेतावर केलेली लागवड यशस्वी ठरली होती. यंदा कंपनीच्या माध्यमातून १५० शेतकऱ्यांनी सोनेरी रंगाच्या कापूस उत्पादनासाठी प्रवर्धन कंपनीच्या बीटी-७४६ या वाणाची लागवड करण्याला पसंती दिली. बाजारभावापेक्षा दहा टक्के अधिकचा दर देऊन खरेदीविषयी आमच्या कंपनीने शेतकऱ्यांना आश्वस्त केले. आम्ही खरेदी केलेला कापूस नुजिवीडू कंपनीच्या समन्वयातून नैसर्गिक रंगीत कापसाची गरज असलेल्या कंपनीला देण्याची सोय केली. पुढील काळात या विषयी नुजिवीडू कंपनीच्या माध्यमातून दरवर्षी अशा कापसाची गरज असलेल्या कंपन्यांशी समन्वय ठेवून एक प्रकारे करार पद्धतीने या कापसाचे उत्पादन घेण्याचा आमचा मानस आहे.

## क्षेत्र आणि उत्पादकता

पाचही तालुक्यांतील सोनेरी रंगाच्या कापूस उत्पादनात सहभागी झालेल्या शेतकऱ्यांनी यंदा सुमारे २० गुंठ्यांपासून चार एकरांपर्यंत लागवड केली. प्रचलित कापूस लागवडी प्रमाणेच शेतकऱ्यांनी लागवड करत खत, कीटकनाशकांचे व्यवस्थापन तसेच ठेवले. शिवार निहाय निसर्गाची साथ व शेतकऱ्यांना त्यांच्या व्यवस्थापनाच्या नियोजनानुसार पाच ते सहा क्विंटलपासून १२ क्विंटलपर्यंत एकरी उत्पादन मिळाले तर मोजक्या शेतकऱ्यांना १५ क्विंटलपर्यंत एकरी उत्पादन मिळाल्याची माहिती संवाद साधलेल्या काही शेतकरी व दुधना हायटेक कृषी प्रोड्यूसर कंपनीचे संचालक श्री. शेजूळ यांनी दिली.

> नैसर्गिक सोनेरी रंगाचा कापूस हा साध्या कापसापेक्षा वेचणीला सोपा आहे. या वाणाची रोगप्रतिकारकशक्ती तुलनेत चांगली आहे. उत्पन्नही अधिक आहे. बाजारभावापेक्षा दर जास्त आहे. त्यामुळे शेतकरी या कापूस उत्पादनाकडे वळले आहेत.
> - **बाबासाहेब अंकुश म्हस्के**,
> संचालक, दूधना हाय टेक कृषी प्रोड्यूसर कंपनी लि., पिसादेवी, छत्रपती संभाजीनगर

> गतवर्षी प्रयोग म्हणून चार एकरांवर नैसर्गिक सोनेरी रंगाचा कापूस लागवड केला होता. या वर्षी १०० एकर लागवड करण्यात आली आहे. या वर्षी उत्पन्न व कापसाची गुणवत्ता व आंतरराष्ट्रीय मार्केटमध्ये असलेली वाढती मागणी लक्षात घेता येणाऱ्या वर्षी नैसर्गिक रंगाच्या कापसाचे क्षेत्र वाढणार आहे.
> - **संभाजी पाटील शेजूळ**,
> संचालक, दूधना हाय टेक कृषी प्रोड्यूसर कंपनी लि., छत्रपती संभाजीनगर

> आमच्या गाव शिवारात दहा पाकिटे सोनेरी रंगाच्या कापसाची लागवड करण्यात आली. निसर्गाची प्रतिकूलता असूनही शेतकऱ्यांना सहा ते सात क्विंटल एकरी उत्पादन मिळाले आहे. शिवाय दरही बाजारभावापेक्षा १० टक्क्यांनी अधिक मिळाला आहे.
> - **रामेश्वर जिवरग**, निमखेडा, ता. फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर

### सुमारे ५०० क्विंटल खरेदी

दुधना हायटेक कृषी प्रोड्यूसर कंपनीचे संचालक श्री. शेजूळ म्हणाले, की आतापर्यंत जवळपास १०० शेतकऱ्यांकडून सुमारे ५०० क्विंटल सोनेरी रंगाच्या कापसाची आमच्या कंपनीने खरेदी केली आहे. बाजारात असलेल्या दरापेक्षा दहा टक्के अधिकचा दर दिला. इतरही शेतकऱ्यांकडून उत्पादित कापसाची खरेदी सुरू आहे

Sakad Agroone 1 January 2026